संशोधन आराखडा

विषय

"मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांचे आर्थिक अध्ययन"

सादर

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्यशाखा अंतर्गत वाणिज्य विषयातील

पीएच. डी. (पदवी) हेतू, संशोधन आराखडा

संशोधक

श्री यशवंत भाऊराव दुबाले

एम. कॉम., एम. फील. (वाणिज्य)

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा

मार्गदर्शक

डॉ. श्रीधर मधुकरराव कोल्हे

एम. कॉम., पीएच. डी., एलएल. बी., जी.डी.सी.ए.

सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख - वाणिज्य भिाग,

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर ता. जिंतूर जि. परभणी

शैक्षणिक वर्ष

२०१६-१७

मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांचे आर्थिक अध्ययन

1. प्रास्ताविक :-

मानवी संस्कृती अस्तीत्वात आली त्या काळात मानव जंगलामध्ये राहुन झाडपाला खाऊन जगत होता. परंतू आजची परिस्थीती पाहिली तर मानवाने जलद गतीने विकास केला आहे. जगातील राष्ट्रापैकी अनेक राष्ट्र असे आहेत की, ज्यांचा अपेक्षित विकास झालेला नसतो, अशा राष्ट्रांना आपण अविकसित राष्ट्र म्हणतो. अशा राष्ट्रासमोर अनेक प्रश्न असतात, ते सोडवतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. सर्वात महत्वाची समस्या बेकारीची आहे. वरकरणी लोक काम करत असलेली दिसतात, परंतू त्यांच्या कामामुळे कुटुंबातील एकुण उत्पन्नात वाढ होत नाही. अशा परिस्थितीत संबंधित व्यक्ती बेकारच असते. देशातील बेकारीची समस्या सोडवण्यासाठी रोजगार उपलब्ध करुन देणे हे सरकारचे पहिले कर्तव्य आहे.

अविकसीत राष्ट्रासमोरील अनेक अडचणीपैकी महत्वाच्या अडचणी पैकी भांडवल व वाढणाऱ्या लोकसंख्येला उपलब्ध करुन द्याव्या लागणाऱ्या रोजगाराची आहे. या दोन्ही अडचणी दूर करण्याकरीता संबंधित देशाला श्रमातूनच विकास घडवून आणावा लागतो. श्रमप्रधान तंत्र उपयोगात आणुन देशास स्वयंनिर्भर करण्याचा प्रयत्न अविकसीत देश करत असतो.

भारताच्या दृष्टीकोनातून विचार करत असतांना देशात राबवत असणाऱ्या पंचवार्षिक योजनेत जास्तीत जास्त बेकारी नष्ट करण्यासंदर्भात भर दिलेला दिसून येतो. ही बेकारी नष्ट करण्यासाठी रोजगार मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जातो. ज्या ठिकाणी रोजगार उपलब्ध करुन द्यावयाचा आहे अशा ठिकाणी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये खाजगी उत्पादकांना विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य दिले जाते. तसेच सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक उपक्रम ही चालविले जातात. प्रामुख्याने ग्रामीण भागात

किंवा मागास भागात लघू व कूटीर उद्योगांना प्रोत्साहन दिले जाते. त्यांना लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. या पाठीमागील उद्येश स्थानिक पातळीवरील मागणी पुर्ण व्हावी व तेथील बेकारांना काम मिळावे हा असतो.

प्रत्येक देशात नैसर्गिक साधनसंपत्ती मोठया प्रमाणात उपलब्ध असते. त्या नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर करुन घेण्यासाठी व देशाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी श्रमाशिवाय पर्याय राहत नाही. श्रमिक हा अविकसीत देशातील उन्नतीसाठी हातभार लावणारा महत्वाचा घटक आहे. अविकसीत देशातील लोकसंख्या उत्तरोत्तर वाढत आहे. परिणामी लोकांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा लागतो, तसेच भांडवलही मर्यादेत असते. म्हणूनच देशातील नैसर्गिक व भौतिक साधनांचा महत्तम उपयोग करुन घ्यावयाचा असेल तर श्रमप्रधान तंत्र अवलंबिले जाते आणि त्या देशाच्या दृष्टीने ते उपयुक्त असते. देशातील आवश्यक गरजा पुर्ण करत असतांना रोजगारीचा उद्येश पूर्ण करावा लागतो. परंतू विकसीत देशाचे असे नसते, कारण त्यांच्याकडे भांडवल मोठया प्रमाणात उपलब्ध असते व लोकसंख्याही नियंत्रीत असते. म्हणुन रोजगारीचा किंवा बेकारीचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी भांडवलप्रधान तंत्र मोठया प्रमाणात उपयोगात आणले जाते.

या ठिकाणी श्रमिकांच्या आर्थिक परिस्थिती विषयी अभ्यास करत असतांना त्यांना मिळणारा मोबदला त्यामधून त्यांना पुर्ण कराव्या लागणाऱ्या गरजा इ. अभ्यास करणे आवश्यक आहे. मराठवाडयातील शेतमाल प्रक्रीया उद्योगातील प्रातिनीधीक म्हणून प्रत्येक जिल्हयातील जिनींग व प्रेसिंग उद्योग, तेल उद्योग व साखर उद्योग प्रत्येकी एक असे तीन उद्योग व आठ जिल्हयातील मिळुन 24 उद्योगांचा समावेश अभ्यास विषयात केला आहे. त्या माध्यमातून जिल्हा निहाय उद्योगांची स्थिती जाणुन घेणे तसेच मराठवाडयातील अर्थव्यवस्थेवर या उद्योगांचा काय परिणाम होतो या संबंधि अभ्यास करणे.

2. शेतमाल प्रक्रिया उद्योग :-

भारतातील शेती मागास राहण्याच्या पाठीमागील कारणापैकी एक कारण शेतमाल पिकवल्यानंतर त्यावरिल करण्यात येणाऱ्या प्रक्रिया संदर्भात अस्तित्वात असलेल्या उद्योगामध्ये शेतकऱ्यांचा सहभागाचा अभाव होय. शेतकऱ्यांनी ग्रामीण भागात शेती सोबतच शेतमाल प्रक्रिया उद्योगात सहभाग घेतल्यास शेती व्यवसाय अधिक फायदेकारक होण्यास मदत होईल. तसेच ग्रामिण भागातील शेतमजूर इतरत्र स्थलांतरीत होणार नाही. शेतातील उत्पादित कापूस, तेलबिया, ऊस इत्यादी मालावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया उद्योग स्थापन झाल्यास शेतकऱ्यांच्या मालास योग्य व किफायतशीर भाव मिळेल व शेतकऱ्यांची आर्थिक समस्या काही प्रमाणात कमी होण्यास सहाय्यक ठरेल.

स्थानिक पातळीवर शेतात उत्पादित होणाऱ्या मालावर वेगवेगळया प्रक्रिया करुन उपभोग्यमुल्य वाढवणारे पदार्थ व वस्तू तयार करणे तसेच उत्पादित कच्चा मालाला योग्य भाव मिळवून देण्यास हे उद्योग उपयोगी ठरतात.

2.1 मराठवाडयातील प्रमुख शेतमाल प्रक्रिया उद्योग :-

मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योग इतर प्रदेशाच्या तुलनेत कमी आहेत त्याची अनेक कारणे आहेत. स्थानिक उद्योजकांचा अभाव, भांडवल उभारणीची समस्या, पायाभूत सुविधांची कमतरता, योग्य बाजारपेठेची अडचण इत्यादी महत्वाची कारणे सांगता येतील.

मराठवाडयातील शेत उत्पादनात अन्नधान्य, कापूस, ऊस, तेलबिया, फळे, भाजीपाला इत्यादी पिकांचा समावेश होतो. सर्वच प्रकारची शेतीपिके येथे उत्पादित होत असलेली दिसतात. परंतू सर्वच पिकांना योग्य भाव मिळत नाही. याचे महत्वाचे कारण मागणी व पुरवठा यांच्यातील असमतोल होय. मराठवाडयातील शेतमालाल योग्य भाव व शेतमजुरांना योग्य मजूरी मिळण्याकरीता त्यासंबंधी परिस्थितीत बदल करणे आवश्यक आहे.

शेतकरी कुटुंबासाठी शेतमाल विक्री किंवा प्रक्रियेचा वेगळा विचार करणे आणि तशी वाट शोधणे ही तशी धाडसाची गोष्ट आहे. मराठवाडयातील काही भागात कृषी आधारित उद्योग अंतर्गत फळे व भाजीपाला प्रकल्प राबविला जातो. आवळा, लिंबू, टोमॅटो, बटाटा, केळी,

पपई, आंबा, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळे व भाजीपाला यावर प्रक्रिया करुन त्यापासून आवळा कॅन्डी, आवळा ज्यूस, आवळा सरबत, लिंबू लोणचे, टोमॅटो चटणी, केचअप, बटाटे वेफर्स, केळी वेफर्स, जॅम, जेली इत्यादी विविध पदार्थ बनवून विक्री केली जाते. तसेच मराठवाडयातील प्रमूख शेतमाल प्रक्रिया उद्योग म्हणजे जिनिंग ॲण्ड प्रेसिंग, तेल कारखाने, साखर कारखाने, गुळ उद्योग इत्यादी होत.

3. संशोधन विषयाचे महत्व (Importance of Research Subject) :-

मराठवाडयातील सर्वांगिण विकासासाठी आवश्यक बाबी पैकी एक शेतमाल प्रक्रिया उद्योगांचा महत्वाचा वाटा आहे. मराठवाडा हा कामगार पुरवणारा प्रदेश समजला जातो, कारण महाराष्ट्र व बाहेरील राज्यातील साखर कारखान्यांना ऊसतोड कामगार म्हणून मराठवाडयातील सर्व जिल्हयातील कमी - अधिक प्रमाणात जातात. मराठवाडयातील बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी या परिसरातील बहूसंख्य कामगार ऊसतोडीसाठी इतरत्र स्थलांतरीत होतात. मराठवाडयातील कामगार स्थलांतरीत होत असल्यामुळे त्यांच्या कुटुंबातील सर्वच व्यक्तींच्या गैरसोयी होतात. मुलांच्या शिक्षणाचे हाल होतात. घरातील वृध्दांचे उदरनिर्वाहाचे हाल होतात. अशा अनेक समस्यांना कामगारांना तोंड द्यावे लागते.

वरील सर्व समस्यांना कमी करायचे असेल तर अशा कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करुन देणे हा उत्तम पर्याय होय. मराठवाडयातील शेतकरी व शेतमजुर यांना स्थायी व खात्रीचे जीवनमान जगण्याकरीता स्थानिक पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. मराठवाडयातील शेतकऱ्यांना शेतमालाला योग्य भाव मिळावा व शेतमजुरांना रोजगार मिळावा याकरीता शेतमाल प्रक्रिया उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे. मराठवाडयात या प्रकारचे उद्योग अस्तित्वात आहेत, परंतू ते परिस्थिती सुधारण्यास पुरेसे नाहीत. या उद्योगात वाढ होणे आवश्यक आहे.

अस्तीत्वात असलेल्या उद्योगांची परिस्थिती व तेथे काम करणाऱ्या श्रमिकांची स्थिती कशा प्रकारची आहे, हे जाणून घेण्याकरीता हा संशोधन विषय निवडला आहे. मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगात सर्वात महत्वाचे स्थान जिनिंग आणि प्रेसिंग युनिट, तेल कारखाने

आणि साखर उद्योग या उद्योगाचे आहे म्हणून या शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांची आर्थिक, सामाजिक स्थिती पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधन प्रस्तावित आहे.

4. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :-

मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांचे आर्थिक अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टये निश्चित केली आहे.

1) मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगाच्या विकासाचा आढावा घेणे.
2) श्रमिक कायदे व श्रमिकांच्या संदर्भात शासकीय धोरणांचा आढावा घेणे.
3) मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगात कार्यरत असलेल्या श्रमिकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
4) शेतमाल प्रक्रिया उद्योगात कार्यरत असणाऱ्या श्रमिकांच्या आर्थिक - सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
5) शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

उपरोक्त उद्दिष्टये प्रस्तुत संशोधनासाठी विचारात घेऊन पुढील गृहितके निश्चित केली आहेत.

5. गृहितके (Hypothesis) :-

1) श्रमिक कायदे श्रमिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुरेसे आहेत.
2) शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांची आर्थिक स्थिती चांगली आहे.
3) शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शासकीय धोरण तर्कसंगत आहे.

6. संशोधन पध्दती (Research Methodology) :-

श्रमिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी जी उद्दिष्टये निश्चित केलेली आहेत ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी चांगल्या संशोधन पध्दतीची गरज आहे. या संशोधन

पध्दतीमध्ये संशोधनाची गरज, माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा इत्यादी बाबींचा विचार महत्वाचा आहे.

1) विषयाची निवड (Selection of subject)
2) संशोधनाची व्याप्ती (Scope of research)
3) माहिती संकलन (Data collection)
4) माहितीचे विश्लेषण (Data analysis)
5) संशोधनाची मर्यादा (Limitation of research)
6) प्रकरणांची मांडणी (Construct of topic)

1) विषयाची निवड :-

मराठवाडयात भौगोलिक संपन्नता असून सुध्दा संबंधित साधनाचा योग्य वापर नसल्यामुळे आर्थिक मागासलेपण दिसून येते. शेतमालास योग्य भाव व बाजारपेठ मिळाल्यास हा मागासपणा दुर होण्यास निश्चितच मदत होणार आहे. त्या अनुषंगाने अलीकडील काळात असे उद्योग उभारण्यास सुरुवात झालेली आहे. परंतू प्रमाण कमी आहे. याचे कारण अनेक बाबी कारणीभूत आहेत त्या शोधणे हा महत्वाचा मुद्दा आहे. या उद्योगात कार्यरत असणाऱ्या श्रमिकांची आर्थिक परिस्थिती जाणून घेण्याकरीता या विषयाची निवड केलेली आहे. श्रमिक हा घटक सजीव असल्यामुळे त्यास 'मानवता' दृष्टीकोनातून लक्षात घेवून सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात का हे शोधण्याचा प्रयत्न करत आहे.

2) संशोधन व्याप्ती :-

मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगात अनेक प्रकारच्या उद्योगांचा समावेश होतो. सर्वच उद्योगांचा अभ्यास एकाच वेळी करणे शक्य नाही म्हणून मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयातील तीन उद्योगांचा समावेश विषय अभ्यासात केला आहे. या तीन उद्योगात 1) जिनिंग ॲण्ड प्रेसींग उद्योग 2) तेल उद्योग 3) साखर उद्योग असे प्रत्येकी एक मराठवाडयातील आठ जिल्हयातून प्रत्येकी एक उद्योग अशी निवड करुन किमान 24 (चोविस) उद्योगांच्या

अभ्यासाचा समावेश करत आहे. प्रत्येक उद्योगातील 10 श्रमिक असे एकुण 240 श्रमिकांकडून संबंधित परिस्थितीची माहिती करुन घेण्याचा प्रयत्न करणे.

3) माहिती संकलन :-

प्रत्येक जिल्हयातील उद्योग ठिकाणास भेट देवुन तेथील इतंभूत माहिती घेणे. श्रमिकांना प्रत्यक्ष त्यांच्याकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून कामाच्या व मजुरीच्या दृष्टीने चांगल्या वाईट गोष्टी व काही मार्गदर्शक गोष्टी माहिती होतात का? या अनुषंगाने अभ्यास करणे. तसेच श्रमिकांच्या कामाविषयी भावना, मजूरीविषयीची अपेक्षा त्यांचा जिवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन याचे सर्व ज्ञान घेण्याचा प्रयत्न करणे.

4) माहितीचे विश्लेषण :-

माहितीचे संकलन केल्यानंतर ती जशीच्या तशी न ठेवता त्यातून निष्कर्ष काढण्या करीता त्यावर योग्य ती प्रक्रिया करावी लागते. माहितीचे वर्गीकरण करणे, सारणीयण करणे, माहितीला आलेख आकृती च्या स्वरुपात मांडणी केल्यास ती अधिक प्रभावी ठरते. जी माहिती अंकांच्या साहयाने कोष्टकात मांडल्यास सर्व सामान्यांच्या आकलनात येत नाही, ती माहिती आकृती व आलेखातून सहज आकलनात येते.

5) संशोधनाची मर्यादा :-

मराठवाडयातील शेतमाल प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांचे आर्थिक अध्ययन हा संशोधन विषय निवडलेला आहे. परंतू मराठवाडयातील सर्वच शेतमाल प्रक्रिया उद्योगाचा समावेश करणे शक्य नसल्यामुळे मराठवाडयातील 8 (आठ) जिल्हयापैकी प्रत्येक जिल्हयातील सहकारी किंवा खाजगी उद्योग समूहातून जिनिंग व प्रेसिंग उद्योग, साखर उद्योग व तेल उद्योग प्रत्येकी एक या प्रमाणे प्रतिनिधीक उद्योगांचा समावेश केला आहे व येथील श्रमिकांचेच आर्थिक व सामाजिक अध्ययन करण्यात येईल.

6) प्रकरणांची मांडणी :-

1) प्रास्ताविक

2) संशोधन पध्दती व आराखडा

3) मराठवाडयातील प्रमुख शेतमाल प्रक्रिया उद्योग

4) श्रमिक कायदे व श्रमिकांच्या संदर्भात शासकीय धोरणांचा आढावा घेणे

5) श्रमिकांचे आर्थिक अध्ययन

6) श्रमिकांच्या समस्या

7) सारांश, निष्कर्ष व उपाययोजना

संदर्भ ग्रंथ सूची :-

1. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. व्ही. बी. ककडे, "भारतातील बेराजगारी आणि रोजगाराचा हक्क", प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, पृष्ठ 41.
2. Thakur S. Y. (1985), "Rural Industrialization in India", Sterling Publishers, New Delhi, P. 124.
3. Gupta S. K. (1993), "Development of Agro based Industries : Problems and Prospects", Deep and Deep Publications, New Delhi, P. 49.
4. Venkaiah V. (1987), "Impact of Agro - Base Industries on Rural Economy", Himalaya Publishing House, Bombay, P. 18.
5. वि. ग. राऊळ, "प्रकिया उद्योग - वाव व गरज", मार्च 2011, "कृषि पणन मित्र"
6. Damayanti U. T., "Agricultural Labour in India : Some Basic Issues", 103 New Delhi, Atlantic Publishers, 1995.

7. G. S. Mehta, Sponsored by planning commission, Govt. of India, New Delhi, "Agro-Processing Industry in Uttar Pradesh" Dece. 2012, P. 199.

8. Dr. Pawankumar Dhiman, Mrs. Amita Rani, "Problems and Prospects of Small Scale Agro Based Industries : An Analysis of Patiala District", Zenith International Journal of Multidisciplinary Research, Vol. 1, Issue 4, August 2011, ISSN22315780.